# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

शिरडी ४२३ १०९.

तालुका-राहाता, जिल्हा-अहमदनगर

दुरध्वनी क्रमांक (०२४२३) २५८५००, खरेदी विभाग- २५८७७१, २५८७७२, २५८८५८, २५८८६१

फॅक्स क्रमांक +९१-०२४२३-२५८८७०

Website – www.sai.org.in E-mail 1.saibaba@sai.org.in 2.purchase@sai.org.in

**मुंबई कार्यालय** - साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, दादर

मुंबई-४०० ०१४ दूरध्वनी क्रमां क (०२२) २४१६६५५६, २४१६१२९३


## श्री साईबाबा संस्थानचे कर्मचारी गणवेष शिलाईसह पुरविणेबाबत ई-निविदा -२०२२

## श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

## निविदाधारकांसाठी सूचना

१. ई-निविदेसोबत सादर करावयाची कागदपत्रे व इतर शर्ती/अटींचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

२. निविदाधारकाने निविदेसोबत ई-निविदा फी रक्कम रू.१५,०००/- व बयाणा रक्कम रू.१,५०,०००/- www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन भरावी.

३. पूर्ण माहिती भरलेली निविदा मुदतीत ऑनलाईन सादर करावयाची जबाबदारी निविदाधारकांवर आहे.

४. सदर निविदा दि. 26/06/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून दि. 03/08/२०२२ सायं. ०५.०० वाजेपर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Downloading व Uploading साठी उपलब्ध राहील.

५. ई-निविदेसोबत फक्त Online कागदपत्रे सादर करावयाची आहेत. Hard Copy मध्ये कागदपत्रे सादर करु नयेत. Hard Copy मध्ये सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही.

६. सदर ई- निविदेमध्ये MSME अंतर्गत ई-निविदा फी व बयाणा रक्कम न भरण्याची सवलत लागु नाही याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

७. शक्य झाल्यास दि. 04/08/२०२२ रोजी ई-निविदा Technical Bid उघडण्यात येईल.

८. Commercial Bid उघडणेचे दिवशी आपण किंवा आपले प्रतिनिधींना उपस्थित राहणेबाबत दुरध्वनीद्वारे कळविण्यात येईल. ऑनलाईन निविदा सादर करताना निविदाधारकांनी आपले दुरध्वनी/मोबाईल नंबर ऑनलाईन निविदेमध्ये नमूद करावेत, म्हणजे टेक्निकल बीड मध्ये पात्र ठरणा-या निविदाधारकांना Commercial Bid उघडणेची तारीख व वेळ कळविता येईल.

९. गणवेष कापडाचे Technical Specifications ई-निविदेतील पान नंबर २ मध्ये देण्यात आले आहे. ते विचारात घेऊनच ई-निविदा भरण्यात यावी.

१०. अपुर्ण निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

११. कोणतीही निविदा अंशत:/पुर्णपणे स्विकारणेचा अगर सर्व निविदा नाकारणेचा अधिकार संस्थान प्रशासनाने राखून ठेवला आहे. त्याबद्दलची कारणे देणे संस्थान प्रशासनावर बंधनकारक राहणार नाही.

(भाग्यश्री बानायत, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी

**श्री साईबाबा संस्थान वि श्वस्तव्यवस्था (शिर्डी)**
**शिर्डी– ४२३ १०९. तालुका- राहाता, जिल्हा-अहमदनगर**

## निविदेच्या शर्ती व अटी

१. गणवेष कापडाचे वर्णन रेमंड कंपनीचे कापडाचे कोड नंबर ई-निविदेतील BOQ मध्ये दिलेला आहे. सदर BOQ मध्ये दर नमुद करुन निविदा ऑनलाईन भरावयाची आहे.

२. निविदाधारकाने निविदेसोबत ई-निविदा फी रक्कम रू.१५,०००/- व बयाणा रक्कम रू.१,५०,०००/- www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन भरावी.

३. दुकान नोंदणी दाखला/स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला/उत्पादक संस्थेचा दाखला/तत्सम शासकीय परवाना, GST Number Certificate किंवा ऑनलाईन GST Number Registration Receipt, पॅन कार्ड ऑनलाईन सादर करणे बंधनकारक राहील.

४. **Raymond कंपनीचे अधिकृत विक्रेते/डिलरशिप असल्याचे प्रमाणपत्र, इत्यादी कागदपत्रे ऑनलाईन ई-निविदेत जोडणे बंधनकारक राहील.**

५. निविदाधारकाने कर्मचारी गणवेष शिलाईसहचे एकत्रित दर हे शिर्डी संस्थानचे भांडार विभागात पॅकिंग व फॉरवर्डींगसह पोहोचचे सर्व कर समावेशक द्यावेत. GST, GST-TDS, इतर टॅक्स, जकात लागू असल्यास त्याचा खर्च, वाहतुक खर्च वगैरे सर्व खर्चासह **प्रती गणवेष दर निविदेत ऑनलाईन भरावेत.**

६. सदर निविदेत दर भरतांना गणवेष शिलाईसह यामध्ये सुटींग कापड, शर्टींग कापड व शिलाईसह एका गणवेषासाठी प्रती ड्रेसचे दर ऑनलाईन भरावेत.

७. शासन नियमानुसार आयकर, वस्तु व सेवा कर इ.संबंधित कर विषयक कपाती बीलातून करण्यात येतील. तसेच शासन वेळोवेळी ज्या प्रमाणे करांचे दरात बदल करेल त्यानुसार ते लागू करण्यात येतील. शासनाने एखादा नवीन कर लागू केल्यास नियमानुसार त्याची अंमलबजावणी करण्यात येईल.

८. **ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या फर्मची सन २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० या ३ आर्थिक वर्षांची किमान वार्षिक सरासरी उलाढाल रक्कम रू. ४ कोटी असणे अनिवार्य राहील. तसे उलाढाल नमुद असणारे व निविदेसोबत दिलेल्या नमुन्याप्रमाणे सी.ए यांचे प्रमाणपत्र ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.**

९. गणवेष शिलाई प्रत्येक कर्मचाऱ्यांचे वैयक्तिक मापे घेऊन करावयाची आहे. प्रत्येक कर्मचाऱ्यांची मापे स्वतंत्ररित्या नोंदवून ठेवावयाची आहेत व त्याप्रमाणे गणवेष शिलाई झालेनंतर संबंधित कर्मचा-यांस समक्ष ट्रायल घेऊन, त्या कर्मचाऱ्यांच्या सुचनेनुसार बदल/दुरुस्ती करून देणे निविदाधारकावर बंधनकारक राहील.

१०. न्युनतम दरधारकाचा नमुना गरज भासल्यास संस्थानचे सामान्य प्रशासन विभागामार्फत सक्षम प्रयोगशाळा/संस्था यांचेकडून तपासून घेण्यात येईल. निविदेत नमुद रेमंड कंपनीचे सुटींग व शर्टिंगच्या नंबर कोडप्रमाणे कापड नसल्यास न्युनतम दरधारकावर संस्थान प्रशासनाने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे उचित कारवाई करण्यात येऊन त्याची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

११. पुरवठा आदेश दिल्यापासून ३० दिवसांत दिलेल्या रेमंड कंपनीचे सुटींग व शर्टिंगच्या नंबर कोडप्रमाणे व मान्य नमुन्याप्रमाणे गणवेष शिलाईसह पुरवठा करावे लागेल.

१२. श्री साईबाबा संस्थानने दिलेले कापडाचे कलरमध्ये काही बदल करावयाचे झाल्यास त्याप्रमाणे निविदाधारकांने नवीन कापडाचे शेड उपलब्ध करून दयावे लागतील. त्याप्रमाणे रंगसंगती निश्चित करून अंतिम करणेत येईल त्यात कुठलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

...२...

१३. BOQ मध्ये असलेली कर्मचारी संख्या यामध्ये प्रत्येक्ष कार्यादेश देतेवेळी वाढ किंवा घट होऊ शकते. त्यानुसार गणवेष शिलाईसह पुरवठा करणे पुरवठाधारकांवर बंधनकारक राहील.

१४. सुरक्षा निरीक्षक व सुरक्षा रक्षकांचे गणवेशासाठी लागणारे इतर साहित्य उदा.बटन, चेन, कॉलर, पॉकेटींग इत्यादी साहित्याचा दर्जा खालीलप्रमाणे असावा.

०१. शर्टसाठी कॉलर- प्रेस ३ इंची पॉईंट

०२. शर्टवर लोगो एम्ब्रायडरी- सिल्कचा रंगीत धागा

०३. पॅन्टचे पॉकेटींग-१०० टक्के टेरीकॉट पॉलीस्टर

०४. पॅन्टची चेन- वायकेके

०५. पॅन्टसाठी हुक व लुप्स- उत्तम दर्जाचे, स्टील पंच हुक-२ पार्ट, लप्स १.२५ इंच

०६. इंटरलॉक ओव्हरलॉक-५ पदरी पॉलीस्टर धाग्याचे

०७. पॅन्टसाठी बेल्ट कॅनव्हॉस- प्रेस १.५ इंची

०८. बटन- पारस नायलॉन हिटप्रुफ

०९. शिलाईसाठी धागा- Amato

१५. निविदा मंजुर झालेनंतर ३% सुरक्षा अनामत रक्कम त्वरित डी.डी.व्दारे/रोखीने भरावी लागेल. तसेच शिर्डी येथे समक्ष येऊन रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर त्वरित करारनामा नोटरी करुन देणे बंधनकारक राहील. करारनाम्याची नोटरी फी निविदाधारकास आदा करावी लागेल

१६. कर्मचारी गणवेष शिलाईसह पुरवठ्यापोटी आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

१७. शासनाच्या खरेदी नियमावलीप्रमाणे ज्यांच्या निविदा मंजूर होतील त्यांना विहीत मुदतीत गणवेष शिलाईसह पुरवठा करावयाची हमी म्हणून मंजुर पुरवठा आदेशातील एकुण रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून ठेवावी लागेल सदर सुरक्षा अनामत रक्कम व्यवस्थित रित्या गणवेष शिलाईसह पुरवठा केलेनंतर परत केली जाईल. सुरक्षा अनामत अगर बयाणा रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

१८. निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्प्यावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

१९. पुरवठा आदेशातील वर्णनाप्रमाणे व मान्य नमुन्याप्रमाणे गणवेष शिलाईसह पुरवठा करावा व त्याप्रमाणेच बिल सादर करावे. सदर बील साधारण ३० दिवसात आदा करण्याचे प्रयत्न राहील.

२०. शासन नियमानुसार आवश्यक असलेल्या कर कपाती बिलातून करण्यात येतील.

२१. कमी दर्जाचे, वेगळया प्रकारचे गणवेष स्विकारले जाणार नाही. अशा गणवेषाचा पुरवठा झाल्यास तो स्वखर्चाने तात्काळ परत घेऊन जाणे पुरवठादारावर बंधनकारक राहील. ते न नेल्यास, त्याची नासधूस झाल्यास संस्थान प्रशासन जबाबदार राहणार नाही.

२२. पुरवठादाराने पुरविलेले गणवेष संस्थान प्रशासनाने नाकारल्यास व त्यामुळे श्री साईबाबा संस्थानला बाजारभावाने दुसरीकडून गणवेष शिलाई करून घ्यावे लागल्यास त्यासाठी जादा आलेल्या खर्चाची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतुन अथवा श्री साईबाबा संस्थानकडून इतर देय असलेल्या बीलातून वसुल केली जाईल.

२३. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो राहाता/कोपरगाव कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.

२४. निविदाधारकांच्या अटी/शर्ती संस्थानवर बंधनकारक राहणार नाहीत.

२५. कोणतीही निविदा मंजुर अथवा नामंजुर करण्याचा अगर सर्व निविदा नाकारण्याचा हक्क संस्थानने राखून ठेवला आहे.

२६. सदर ई-निविदेचा वैधता कालावधी तांत्रिक निविदा उघडल्याचे तारखेपासुन १८० दिवसांचा राहील.

२७. Commercial Bid उघडलेनंतर चुकुन Items चे दर कमी भरले गेले अशी विनंती केली तर ती कुठल्याही परिस्थितीत ग्राह्य धरली जाणार नाही. त्यामुळे निविदाधारकाने Online दर भरताना काळजीपुर्वक भरावे. .

...३...

२८. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे. निविदाधारकाची कोणतीही अट/अटी संस्थान प्रशासनावर बंधनकारक राहणार नाही, अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

**आपत्ती/ नैसर्गिक आपत्ती, नुकसान भरपाई व दंडात्मक कारवाईबाबतची तरतुद :-**

२९. २५. पुरवठा आदेशातील गणवेष मुदतीत पुरविले नाही तर खालीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

| | |
|---|---|
| अ) पुरवठा न केलेल्या गणवेषांची किंमत रु.२.०० लाखापेक्षा कमी असल्यास | प्रती आठवडा ०.५० % दराने जास्तीत जास्त १० % पर्यंत |
| ब) पुरवठा न केलेल्या गणवेषांची किंमत रु.२.०० लाख किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास | प्रती आठवडा ०.५० % दराने जास्तीत जास्त ५ % पर्यंत |

२६. पुरवठाधारकाने कुठल्याही कारणाने गणवेषचा पुरवठा केला नाही अगर अटी शर्तींचा भंग केल्यास तर पुरवठाधारकाला पुढील ३ वर्षांसाठी काळया यादीत टाकले जाईल तसेच बयाणा रक्कम/सुरक्षा अनामत रक्कम जप्त केली जाईल अगर संस्थान प्रशासन जो निर्णय घेतील तो संबंधित पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. याबाबत पुरवठाधारकाची कुठलीही तक्रार ऐकुन घेतली जाणार नाही.

२७. गणवेष पुरविणेचा आदेश दिल्यास व त्याचा पुरवठा न झाल्यास, अगर दिलेल्या नमुन्याप्रमाणे नसल्यामुळे नाकारला गेल्यास श्री साईबाबा संस्थानची अडचण होऊ नये म्हणून श्री साईबाबा संस्थानला बाजारभावाने आवश्यक तितके किंवा दिलेल्या आदेशा इतके गणवेष दुसरीकडून खरेदी करण्याची मुभा राहील. अशा खरेदी केलेल्या गणवेषासाठी जादा लागलेल्या रकमेची (फरकाची) भरपाई निविदाधारकाने श्री साईबाबा संस्थानला करुन द्यावी लागेल. सदरची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अगर पुर्वीच्या/नंतरच्या आलेल्या कापडाच्या बिलातून वसुल करण्याचा अधिकार संस्थान प्रशासनाला राहील.

२८. निविदेतील मंजुर दराने व पुरवठा आदेशाप्रमाणे गणवेषचा पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजुर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पुरवठाधारकाने सदर गणवेषचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा गणवेषचा पुरवठा न केल्यास श्री साईबाबा संस्थानला बाजारभावाने अथवा फेर निविदा मागणी करुन गणवेष खरेदी करावे लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई पुरवठाधारकाकडून वसुल केली जाईल.

२९. निविदा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/ नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी निविदाधारकांच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा.युद्ध, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भूकंप वगैरे) पुरवठाधारक गणवेष पुरवठा करु शकला नाही व तसे निविदाधारकाने त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरुप संस्थान प्रशासन जो निर्णय घेईल तो निविदाधारकावर बंधनकारक राहिल.

३०. विलंबानंतर गणवेषांचा पुरवठा केल्यास ते स्वीकारण्याचे बंधन श्री साईबाबा संस्थानवर राहणार नाही.

३१. राज्याबाहेरील निविदाधारकाची निविदा मंजूर झाल्यास शासन खरेदी नियमावलीतील नियम क्रं.३.१.२.८ नुसार राज्याबाहेरील पुरवठादार जर न्युनतम असला व महाराष्ट्र राज्यातील पुरवठादार व्दितीय असला तर महाराष्ट्र राज्यातील पुरवठादारांना प्रोत्साहन देण्यासाठी, महाराष्ट्र राज्यातील व्दितीय न्युनतम दरधारक जर न्युनतम दरधारकाच्या दरात साहित्य पुरविण्यास तयार असेल तर एकूण खरेदी करावयाच्या साहित्याच्या ५०% साहित्याचा पुरवठा आदेश राज्यातील पुरवठादारांना देण्यात येतील व जर ते तयार नसतील तर पुर्ण साहित्याचा पुरवठा आदेश राज्याबाहेरील पुरवठादारांना देण्यात येईल.

(भाग्यश्री बानायत, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

# निविदाधारकाबाबत माहिती

| | | |
|---|---|---|
| १. | फर्मचे नांव- | ---------------------------------------------------- |
| २. | पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता- | ---------------------------------------------------- |
| ३. | दूरध्वनी क्रमांक- | ---------------------------------------------------- |
| | ऑफीस- | ---------------------------------------------------- |
| | दुकान- | ---------------------------------------------------- |
| | निवास- | ---------------------------------------------------- |
| | मोबाईल नंबर- | ---------------------------------------------------- |
| | फॅक्स नंबर- | ---------------------------------------------------- |
| | ई –मेल | ---------------------------------------------------- |
| ४. | संपर्कासाठी व्यक्तीचे नांव- | ---------------------------------------------------- |
| | दूरध्वनी/ मोबाईल क्रमांक- | ---------------------------------------------------- |
| ५. | मालकाचे/भागीदारांची नावे | १. ------------------------------------------------ |
| | | २. ------------------------------------------------ |
| ६. | बॅंक खाते नांव | १.------------------------------------------------- |
| | शाखा | २. ------------------------------------------------ |
| | खाते नंबर व प्रकार | ३.------------------------------------------------- |
| | आयएफएससी कोड | ४.------------------------------------------------- |

दिनांक :- / /२०२२

ठिकाण :-

निविदाधारकाची सही व शिक्का

अ) **Technical Bid मधील कागदपत्रे (चेक लिस्ट)**

१. अद्ययावत दुकान नोंदणी दाखला/स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला उत्पादक संस्थेचा दाखला/ तत्सम शासकीय परवाना (उदा.ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगर पालिका)

२. GST Number Certificate किंवा ऑनलाईन GST Number Registration Receipt

३. पॅन कार्ड

४. Raymond कंपनीचे अधिकृत विक्रेते/डिलरशिप असलेबाबतचे कंपनीचे प्रमाणपत्र

५. सन २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० या ३ आर्थिक वर्षाची किमान वार्षिक सरासरी उलाढाल रक्कम रू.४ कोटी असलेबाबतचे सोबतचे नमुन्याप्रमाणे सी.ए यांचे प्रमाणपत्र

दिनांक - / /२०२२

ठिकाण -

**निविदाधारकाची सही व शिक्का**

प्रति,
**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)
शिर्डी, ता.राहाता, जिल्हा-अहमदनगर.

**विषय – श्री साईबाबा संस्थानचे कर्मचा-यांना गणवेष शिलाईसह पुरविणेबाबत ई-निविदा.**

महोदय,

खालील सही करणार मी/आम्ही कळवितो की, वरील विषयाबाबत आपण प्रसिद्ध केलेली निविदा वाचली. आपल्या निविदेत दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून त्या मला /आम्हाला मान्य आहेत. आपले अटी/शर्तींचे पालन करावयाचे मी/आम्ही मान्य करीत आहे/आहोत.

मी/आम्ही आपणांस निविदेमध्ये नमुद केलेल्या कापड आपल्या मागणीप्रमाणे उपरोक्त कालावधीकरिता, संस्थानचे मागणीनुसार, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांचे भांडार पोहोच करण्याची हमी देतो. सदर गणवेष शिलाईसह पुरविणेचे परिमाण अंदाजे असल्यामुळे वेळ प्रसंगी नमुद केलेल्या परिमाणापेक्षा २५% पर्यंत जास्त कापडाची संस्थानतर्फे मागणी झाल्यास मी/आम्ही तो मंजुर दराने पुरविण्याची हमी देत आहे/आहोत.

माझी/आमची निविदा मंजूर झाल्यास मंजूर दराने गणवेष शिलाईसह पुरवठा करण्याची हमी म्हणून मंजुर पुरवठा आदेश एकुण रक्कमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून निविदा मंजुर झाल्याचे कळविल्यानंतर त्वरित मी/आम्ही रोख/RTGS/NEFT द्वारे भरणा करु. याकामी भरलेली बयाणा रक्कम सुरक्षा अनामत खाती वर्ग करणेस मी/आम्ही संमती देत आहोत. तसेच रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा नोटराईज्ड करुन देऊ व मंजूर दराने निविदा कालावधीत गणवेष मागणीप्रमाणे वेळेवर शिर्डी येथील मध्यवर्ती भांडार विभागात पोहोच करणे माझेवर/आमचेवर बंधनकारक राहील.

दिनांक :- / /२०२२
ठिकाण :-

आपला/आपले विश्वासू,

फर्मचे मालकाचे/भागीदाराचे नांव
(१) -
(२) -
सोबत- कागदपत्रे

सही/सहया व शिक्का

# वार्षीक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र

दाखला देण्यात येतो की, मे. ------------------------------------------------ यांचे निविदेसंबंधित व्यवसायाची सन २०१६-१७,२०१७-१८ व २०१८-१९ या ३ आर्थिक वर्षाची उलाढाल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं | वर्ष | वार्षिक उलाढाल |
|---|---|---|
| १ | सन २०१६-१७ | |
| २ | सन २०१७-१८ | |
| ३ | सन २०१८-१९ | |
| | एकुण | |
| | सरासरी वार्षिक उलाढाल | |

दिनांक :- / /२०२२

ठिकाण :-

लेखापरीक्षकाची सही/चार्टर्ड अकाऊंटंट
(नाव/ सही शिक्का)
नोंदणी क्रमांक.